आकाशवाणी पुणे
पुणे वृत्तांत
वेळ - संध्याकाळी ०६.०० वा.

दिनांक – २०/०४/२०२४ वार – शनिवार

पुणे शहर त्याचबरोबर लगतच्या पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील मिळून सुमारे १२५ मोठ्या गृहनिर्माण संस्थांनी गेल्या काही दिवसांपासून महापालिकेकडून अपुरा पाणी पुरवठा होत असल्याबद्दच्या तक्रारी दाखल केल्या आहेत. स्थानिक नागरिकांना पाण्यासाठी नाईलाजानं टँकरवर अवलंबून राहावं लागत असल्याचं सांगत येत्या ४-५ दिवसात यासंदर्भात विभागीय आयुक्तांसमवेत बैठक घेऊन वस्तुस्थिती मांडणार असल्याचं या संस्थानी सांगितलं. एका बाजूला पुरेशा पाण्यासह अन्य सर्व नागरी सुविधा देण्याच्या नावाखाली महापालिकेकडून भरमसाठ कर आकारणी केली जात असताना दुसऱ्या बाजूला नागरिकांवर टँकरच्या अतिरिक्त खर्चाचा भुर्दंड का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

महावितरणच्या पुणे परिमंडळात गेल्या दोन चार दिवसांपासून वाढलेल्या उष्म्यामुळं विजेची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. ही मागणी पूर्ण करण्याच्या दृष्टीनं महावितरण आणि महापारेषण यांनी एकत्रितरित्या अनेकविध उपाय योजना राबवण्यास प्रारंभ केला आहे. वीज ग्राहकांना विनाव्यत्यय वीजपुरवठा होत राहावा, विजेची वाढती मागणी लक्षात घेऊन एकाच वाहिनीवर ताण येऊ नये यासाठी समान वीज वितरणाच्या दृष्टीनं पावले टाकली जात आहेत. नवीन प्रस्तावित वीज वाहिन्यांची कामे देखील युद्धपातळीवर पूर्ण केली जात असल्याचं महावितरणच्या पुणे परिमंडळाच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं.

महाविकास आघाडीचे पुणे लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी आज पर्वती विधानसभा मतदारसंघात पदयात्रा काढली. वाहतूक कोंडी, विसकळीत पाणीपुरवठा, शहरातील पर्यावरणाचे प्रश्न, पायाभूत सुविधांचा अभाव यामुळे शहरातील नागरिकांना अनेक समस्यांना सामोरं जावं लागत असून, निवडून आल्यास या प्रश्नांवर काम

करू, असं आश्वासन धंगेकर यांनी यावेळी दिलं. या पदयात्रेत इंडिया आघाडीतील विविध घटक पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते.

उन्हाचा वाढता चटका लक्षात घेता पुणे विद्यार्थी गृह कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्स आणि वंचित विकास यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी आणि प्राणी-पक्ष्यांसाठी दाणा-पाणी उपक्रम राबविण्यात आला. 'वाढता उन्हाळा, पक्षांना सांभाळा' या अभिनव उपक्रमातून 'प्राणी वाचवा, पक्षी जगवा' हा विचार पोहोचवण्यात आला; तर आरोग्य शिबिराअंतर्गत ५०० मुलामुलींची तपासणी करण्यात आली.

पिंपरी-चिंचवड शहर स्वच्छ आणि सुंदर करण्याच्या मोहिमेत महिला बचत गट तसेच महिला संस्थांचा सहभाग वाढविण्यात येणार आहे. पिंपरी-चिंचवड शहरात १०१ सार्वजनिक शौचालये असून, नवी दिशा उपक्रमाअंतर्गत शहरातील ५२ ठिकाणच्या सार्वजनिक शौचालयांच्या स्वच्छतेचं काम महिला बचत गटांना देण्यात आले आहे. आता उर्वरित ४९ शौचालयेही ठेकेदारांना न देता महिला बचत गटांनाच देखभाल, दुरूस्तीसाठी देण्यात येणार असून यासाठी तयारी करण्याच्या सुचना अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी क्षेत्रिय अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

पिंपरी चिंचवड महापालिका प्रशासनाने शहरातील नाले स्वच्छतेच्या कामासंदर्भात आज आढावा बैठक घेतली. पावसाळ्यापूर्वी आठही क्षेत्रीय कार्यालयातंर्गत लहान-मोठ्या सुमारे १४८ नाल्याची स्वच्छता पूर्ण करण्याचं काम हाती घेण्यात आले आहे.
हे काम २० मे पूर्वी पूर्ण करावे, स्वच्छतेचा अहवाल आरोग्य विभागाकडे सादर करावा, बुजविलेले नाले, नाल्यावरती अतिक्रमण केलेले आढळून आल्यास संबंधित व्यक्तीवर कारवाई करावी, अशा सूचना अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी या बैठकीत दिल्या.

पुण्यातील धायरी, डीएसके विश्व, नांदेड पासून खडकवासला, सिंहगड पायथ्यापर्यंतच्या परिसराला आज दुपारनंतर वादळी वारे आणि जोरदार पावसानं झोडपून काढलं. दुपारी ३ वाजल्यापासूनच अंधारून आलं आणि विजांचा लखलखाट सुरू झाला. शनिवार रविवारच्या सुटीच्या निमित्तानं खडकवासला, पानशेत धरण आणि सिंहगडावर जाणाऱ्या पर्यटकांची अचानक आलेल्या पावसानं तारांबळ उडाली. अनेक भागात वाहतुकीची कोंडी देखील झाली होती.

उत्तर भारतातील स्थलांतरित कामगार मतदानासाठी मूळ राज्यात जात असल्याने उत्तर भारतात जाणाऱ्या रेल्वे गाड्यांना मोठी गर्दी होत आहे. उन्हाळी सुट्यांमुळेही गर्दी वाढली आहे. गर्दी कमी करण्यासाठी गाड्यांची संख्या वाढविण्यात आली आहे. तरीदेखील प्रवाशांची संख्या दुपटीहून अधिक झाल्यानं तिकीट विक्री थांबविण्यात येत आहे.
मध्य रेल्वेच्या पुणे विभागातून एप्रिल ते जून दरम्यान विशेष गाड्यांचा २४६ फेऱ्या वाढवण्यात आल्या आहेत. रेल्वेकडून उन्हाळी विशेष गाड्यांची संख्या वाढविण्यात आली असली तरीही या गाड्यांमध्ये प्रवाशांना बसण्यास जागा मिळत नसल्याचं चित्र दिसून येत असल्याचं आमच्या वार्ताहरांनं कळवलं आहे.

हवामान
आज कमाल तापमान ३९ अंश तर किमान तापमान २३ पूर्णांक ९ दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही आकाश अंशत: ढगाळ राहून मेघगर्जना आणि विजांसह हलक्या स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू संध्याकाळी ०६.०० वाजता, विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.